# निवडक रुग्ण कथा

डॉ. श्रीकान्त वाघ, ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट, पुणे

Coping with Rheumatoid Arthritis
(Marathi)



## संधिवात - तेव्हा आणि आता

## सौ. सुवर्णा अनिल गोवंडे (बडोदा)

मी बडोद्यात राहते. सुमारे सात-आठ वर्षांपूर्वी नॉर्मल बाईचे असते तसेच माझे आयुष्य होते. थोड्या हालचालीने अथवा थोड्या कामाने उजव्या हाताचा अंगठा खूप दुखायचा पण मी त्याकडे सवयीने दुर्लक्ष केले व त्यानंतर फिजिशियनकडून औषधे घेतली.

पण मला माहीत नव्हते, ही माझ्या खूप मोठ्या सत्त्वपरीक्षेची सुरुवात आहे. खूप सहन करायला लावणाऱ्या अशा खेळीला मला सामोरे जावे लागणार आहे.

एक शत्रू आपल्यावर नकळत हल्ला करतो आहे. हे माझ्या ध्यानी-मनीही नव्हते. त्यानंतर चालू झाले वेगवेगळे डॉक्टर, कोणी घरगुती उपाय सांगायचे. पण रोगाचे प्रमाण हळूहळू वाढत होते.

थोड्या दिवसानंतर माझ्या शरीराच्या हालचाली मंदावत गेल्या. त्यानंतर होमिओपॅथीचा उपचार सुरू केला. मूळ दुखणे तसेच राहून इतर तक्रारी चालू झाल्या. कंटाळूनतेही औषध बंद केले.

त्यानंतर आयुर्वेदाचा सहारा घेतला. पण मुख्य वेदनेचा त्रास तसाच होता. त्यामध्ये काढे, पुड्या, चूर्ण पथ्य असे चालू होते. हळूहळू वजन कमी होत गेले. प्रत्येक महिन्याला एक किलो वजन कमी. त्या डॉक्टरांचे तर असे म्हणणे पडले, इतक्या वेदनांमुळे शरीरातील चरबी झडून जातेय. त्या उपचारादरम्यान कधीही रक्ततपासणी केली नाही. त्यामुळे वाताच्या दुखण्यावर औषधांचा कितपत उपयोग होतोय हे कळायला मार्ग नव्हता.

एक दिवस असा आला की माझे मला चालणे, फिरणे, उठणे सर्व अशक्य झाले. वेदनेची तीव्रता वाढली. डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणे दवाखान्यात ॲडमिट व्हावे लागले व रक्ततपासणीमधे समजले की हिमोग्लोबीन फक्त ५ ग्रॅम आहे. (पण पुड्या म्हणून जी औषधे दिली जात होती, त्यामध्ये कोणते घटक आहेत हे सांगितले नाही). हिमोग्लोबिन वाढवण्यासाठी रक्त चढवावे लागले. पण कालांतराने त्याचा काहीही उपयोग झाला नाही. कारण सहा महिन्यांनी परत हिमोग्लोबिन पाचच होते.

याचा अर्थ नक्की काय प्रॉब्लेम आहे हे कळायला मार्ग नव्हता. त्या दरम्यान माझे सर्व शरीर म्हणजे हाडांचा सापळा, निस्तेज चेहरा. मानसिकरित्याही मी पूर्णपणे तुटून गेले होते. कारण सर्व दिवसभर मी अंथरुणातच असायचे. स्वत:च्या हाताने पाणी पिणेही मुश्किल झाले होते. पूर्ण अपंगत्व. सुरुवातीला सर्व नातेवाईक व शेजारी आस्थेने चौकशी करीत, पण नंतर तेही कंटाळले.

ह्या सर्व प्रकारामध्ये मला पूर्ण उदासीनता आली होती. मनात आत्महत्येचे विचार यायला लागले होते.आत्मविश्वास पूर्णपणे गेला होताच. समाजापासून लांब जायला लागले. सर्वांची प्रतिक्रिया अशीच होती की ही आता कायमची अंथरुणावरच राहणार. कारण संधिवातावर उपचार नाहीत.

या कालावधीत सर्वात मोठा आधार माझी आई व माझे पती यांनी दिला. ती. आई तर स्वत:चे वय विसरून माझ्याजवळ राहून मला सर्व मदत करीत होती. तिनेच मला सकारात्मक विचार करायला शिकवले.

त्यानंतर कदाचित माझ्या दु:खाचे दिवस संपले असावेत. आईच्याच सांगण्यावरून मी पुण्याला माझ्या माहेरी जायचे ठरवले. तेथील आमचे फॅमिली डॉक्टर डॉ. भगली यांच्यातर्फे आम्ही डॉ. श्रीकांत वाघ ह्यांच्यापर्यंत पोहोचलो. (त्याआधी सर्व वैद्यकीय तपासण्या पूर्ण केल्या होत्या). पण तरीही माझ्या मनात निराशा होतीच. आता हा उपचार केल्यावर जर उपयोग झाला नाही तर या सर्वांतून सुटका करून घ्यायचे हे नक्की ठरवले होते. सुदैवाने तशी वेळ आली नाही.

सर्वात प्रथम डॉक्टर वाघ यांनी शांतपणे सर्व रिपोर्ट पाहिले. मी खूप हवालदिल झाले होते. पण डॉक्टरांनी प्रथम घाबरण्यासारखे काही नाही असे सांगितले. मला तेव्हाच खूप धीर आला. आजच उपचार सुरू करतो असे म्हणाले. व त्यानंतर त्यांची ट्रीटमेंट सुरू झाली. त्यांचा पेशंटशी वागायचा ॲटिट्यूड खूप चांगला आहे. पेशंट आश्वस्त होतो. मलाही तसेच झाले.

सुरुवातीला दीड-दोन महिन्यांनी पुण्यात यावे लागत होते. पण त्यावेळी डॉक्टरांकडून पूर्ण सहकार्य मिळाले. हळूहळू त्यांच्या औषधाने  माझ्यात सुधारणेला सुरुवात झाली. माझी स्वत:ची कामे मी करू लागले. त्यामुळे माझा आत्मविश्वास वाढायला लागला. डॉ. वाघ यांच्या औषधांमध्ये कोणतीही महागडी, न परवडणारी अशी औषधे नाहीत. अजून एक गोष्ट मला इथे नमूद करायची आहे. स्टिरॉईड हा शब्द मला खूप जणांनी घाबरवून टाकणारा असा सांगितला होता. पण माझा स्वत:चा असा अनुभव आहे की एक मी वेदनामुक्त बनले व दुसरे म्हणजे दोन वर्षांच्या कालावधीत त्या गोळीचे प्रमाण कमी करत आणले व सध्या स्टिरॉइडचा माझ्या शरीरावर कोणताही परिणाम झालेला नाही. अलीकडेच मी रक्ततपासणी केली त्यामध्ये माझे सर्व रिपोर्ट चांगले आहेत. आणि आता दीड-दोन वर्षांच्या कालावधीत मी पूर्ण बरी झाले आहे. मला सांगायला खूप आनंद होतोय की मी माझी बॅग घेऊन रेल्वे, बस, रिक्षा यांचा प्रवास न घाबरता करते. जिना चढू-उतरू शकते. मला मांडी घालून व्यवस्थित बसता येते. मला पेन धरून व्यवस्थित सहीसुद्धा करता येत नव्हती. आणि आज मी हे सर्व लिखाण एकाच बैठकीत पूर्ण केले आहे.

अजून एकच सांगायचे आहे की माझ्या आईच्या शेवटच्या दुखण्यात मी तिची सेवा करू शकले. तिच्यासोबत राहिले. (केवळ माझी तब्येत चांगली असल्याने) ही माझी सर्वात मोठी जमापुंजी आहे, ती केवळ मला डॉ. वाघ यांच्यामुळे मिळाली.

माझी ईश्वरचरणी मनापासून प्रार्थना आहे की माझ्याप्रमाणे इतर लोकांनाही त्यांच्या ज्ञानाचा, उपचारांचा फायदा मिळावा. डॉ. वाघ यांना ईश्वर खूप खूप यश देवो.